श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

# श्रीमद् भागवत रसिक कुटुंब

## गजेन्द्र मोक्ष

### श्रीमद्भागवतमहापुराणम्

### अष्टमः(स्) स्कंधः

### ॥ अथ तृतीयोऽध्यायः ॥

### श्री शुक उवाच

**एवं(वँ) व्यवसितो बुद्ध्या, समाधाय मनो हृदि |**

**जजाप परमं(ञ्) जाप्यं(म्), प्राग्जन्मन्यनुशिक्षितम् ॥ 1 ॥**

**श्री शुक म्हणतात - आपल्या बुद्धीने असा निश्चय करून गजेंद्राने आपल्या मनाला हृदयात एकाग्र केले आणि नंतर पूर्वजन्मी शिकलेले श्रेष्ठ स्तोत्र म्हणून तो भगवंतांची स्तुती करू लागला .**

### गजेन्द्र उवाच

**ॐ नमो भगवते तस्मै, यत एतच्चिदात्मकम्।**

**पुरुषायादिबीजाय, परेशायाभिधीमहि ॥ 2 ॥**

**गजेंद्र म्हणाला- जे जगाचे मूळ कारण आहेत आणि सर्वांच्या हृदयामध्ये क्षेत्ररूपात विराजमान आहेत, तसेच सर्व जगाचे एकमात्र स्वामी आहेत, ज्यांच्यामुळे हे विश्व चेतनरूप आहे,त्या भगवंतांना नमस्कार करून मी त्यांचे ध्यान करतो .**

**यस्मिन्निदं(यँ) यतश्चेदं(यँ), येनेदं(यँ) य इदं(म्) स्वयम्।**

**योऽस्मात् परस्माच्च परस्- तं(म्) प्रपद्ये स्वयम्भुवम् ॥ 3 ॥**

हे विश्व ज्यांच्या मध्ये आहे, ज्यांच्या सत्तेने प्रतीत होते, ज्यांनी हे व्यापले आहे आणि जे स्वतःच्या रूपाने प्रगट झाले आहेत आणि जे हे विश्व आणि त्याचे कारण प्रकृती यांच्याही पलीकडे आहेत,त्या स्वयंभू भगवंतांना मी शरण आलो आहे .

**यः(स्) स्वात्मनीदं(न्) निजमाययार्पितं(ङ्),**

**क्वचिद् विभातं(ङ्) क्व च तत् तिरोहितम्।**

**अविद्धदृक् साक्ष्युभयं(न्) तदीक्षते,**

**स आत्ममूलोऽवतु मां(म्) परात्परः ॥ 4 ॥**

हे विश्व ज्यांच्या मायेने स्वतःमध्ये निर्माण झाले आहे, ते कधी प्रतीत होते तर कधी नाही; परंतु ज्यांची दृष्टी जशीच्या तशी एक सारखी असते, जे विश्वाचे साक्षी असून प्रगट व अप्रगट या दोन्ही विश्वांना पाहातात, जे सर्वांचे आणि स्वतःचेही मूळ आहेत, प्रकृतीच्याही पलीकडे असणारे हे प्रभू माझे रक्षण करोत .

**कालेन पञ्चत्वमितेषु कृत्स्नशो,**

**लोकेषु पालेषु च सर्वहेतुषु।**

**तमस्तदाऽऽसीद् गहनं(ङ्) गभीरं(यँ),**

**यस्तस्य पारेऽभिविराजते विभुः ॥ 5 ॥**

ज्यावेळी लोक, लोकपाल आणि या सर्वांना कारणीभूत असणारे संपूर्णपणे नष्ट होवून जातात, त्यावेळी फक्त अत्यंत घनघोर आणि निबिड अंधारच अंधार राहातो. परंतु जे अनंत परमात्मा सर्वथैव त्याच्याही पलीकडे विराजमान असतात , ते प्रभू माझे रक्षण करोत .

**न यस्य देवा ऋषयः(फ्) पदं(वँ) विदुर्-**

**जन्तुः(फ्) पुनः(ख्) कोऽर्हति गन्तुमीरितुम्।**

**यथा नटस्याकृतिभिर्विचेष्टतो,**

**दुरत्ययानुक्रमणः(स्) स मावतु ॥ 6 ॥**

जे नटाप्रमाणे अनेक वेश धारण करतात त्यांचे वास्तविक स्वरूप देव किंवा ऋषी जाणत नाहीत तर मग सामान्य प्राणी कसा जाणेल? ज्यांच्या लीलांचे रहस्य जाणणे अत्यंत कठीण आहे ते प्रभू माझे रक्षण करोत.

**दिदृक्षवो यस्य पदं(म्) सुमंगलं(वँ्),**

**विमुक्तसङ्गा मुनयः(स्) सुसाधवः।**

**चरन्त्यलोकव्रतमव्रणं(वँ्) वने,**

**भूतात्मभूताः(स्) सुहृदः(स्) स मे गतिः ॥ 7 ॥**

ज्यांच्या परम मंगलमय स्वरूपाचे दर्शन करण्यासाठी महात्मे लोक असक्तींचा त्याग करून वनात जाऊन अखंडपणे ब्रह्मचर्य आदि व्रतांचे पालन करतात, तसेच आपलाच आत्मा सर्वांच्या ठिकाणी विराजमान आहे असे जाणून सर्वांचे कल्याण करतात, त्या मुनींचे सर्वस्व असणारे भगवान माझे रक्षण करून तेच माझी गती होत.

**न विद्यते यस्य च जन्म कर्म वा,**

**न नामरूपे गुणदोष एव वा।**

**तथापि लोकाप्ययसंभवाय यः(स्),**

**स्वमायया तान्यनुकालमृच्छति ॥ 8 ॥**

ज्यांना जन्म, कर्म ,नाम, रूप नाही की ज्यांच्यात गुणदोष नाहीत असे असून सुद्धा विश्वाची निर्मिती आणि संहार करण्यासाठी वेळोवेळी ते आपल्या मायेने त्यांचा स्वीकार करतात.

**तस्मै नमः(फ्) परेशाय, ब्रह्मणेऽनन्तशक्तये।**

**अरूपायोरुरूपाय, नम आश्चर्यकर्मणे ॥ 9 ॥**

त्या अनंत शक्तीमान सर्वेश्वरीय संपन्न परमात्म्याला मी नमस्कार करतो .ते अरूप असूनही बहुरूप आहेत. त्यांची कर्मे अत्यंत आश्चर्यमय आहेत .माझा त्यांना नमस्कार.

**नम आत्मप्रदीपाय, साक्षिणे परमात्मने।**

**नमो गिरां(वँ्) विदूराय, मनसश्चेतसामपि ॥ 10 ॥**

स्वयंप्रकाश ,सर्वांचे साक्षी अशा परमात्म्याला मी नमस्कार करतो. जो मन, वाणी आणि चित्त यांना कळत नाही, त्या परमात्म्याला मी नमस्कार करतो .

## सत्त्वेन* प्रतिल*भ्याय, नैष्कर्म्येण विप*श्चिता।

## नमः(ख्) कै*वल्यनाथाय, निर्वाणसुखसं(वँ)विदे ॥ 11॥

विवेकी पुरुष कर्म संन्यास किंवा कर्म समर्पणाच्याद्वारे आपले अंतकरण शुद्ध करून ज्यांना प्राप्त करतात, तसेच जे स्वतः नित्यमुक्त, परमानंद व ज्ञानस्वरूप असून दुसऱ्यांना कैवल्यमुक्ती देणारे आहेत, त्या प्रभुंना मी नमस्कार करतो .

## नमः(श्) शान्ताय घोराय, मूढाय गुणधर्मिणे ।

## निर्विशेषाय साम्याय, नमो ज्ञानघनाय च ॥ 12 ॥

जे सत्व, रज ,तम या तीन गुणांच्या धर्मांचा स्वीकार करून अनुक्रमे शांत, घोर आणि मूढअवस्था सुद्धा धारण करतात, त्या भेद रहित समभावाने स्थित असणाऱ्या ज्ञानघन प्रभुंना मी वारंवार नमस्कार करतो .

## क्षे*त्रज्ञाय नम*स्तु*भ्यं(म्), सर्वाध्य*क्षाय साक्षिणे।

## पुरुषायात्ममूलाय, मूल*प्रकृतये नमः ॥ 13 ॥

आपण सर्वांचे स्वामी, सर्व क्षेत्रांना जाणणारे आणि सर्व साक्षी आहात. आपल्याला मी नमस्कार करतो. आपण स्वतःच आपले कारण आहात. पुरुष आणि मूळ प्रकृतीच्या रूपामध्ये सुद्धा आपणच आहात. आपणास माझे वारंवार नमस्कार .

## सर्वेन्द्रियगुण*द्रष्ट्रे, सर्व**प्रत्ययहेतवे।

## असताच्छाययोक्ताय, सदाभासाय ते नमः ॥ 14 ॥

आपण सर्व इंद्रिये आणि त्यांच्या विषयांचे साक्षी आहात, सर्व प्रचितींचे आधार आहात. अहंकार इत्यादी भासमान असत वस्तूतून आपलेच अस्तित्व प्रकट होते.सर्व वस्तूंच्या सत्तेच्या रूपात सुद्धा केवळ आपलाच भास होत आहे. मी आपणास नमस्कार करीत आहे .

नमो नमस्तेऽखिलकारणाय,

निष्कारणायाद्भुतकारणाय।

सर्वागमाम्नायमहार्णवाय,

नमोऽपवर्गाय परायणाय ॥ 15 ॥

**आपण सर्वांचे मूळ कारण आहात पण आपले कोणी कारण नाही. आपण सर्वांचे विलक्षण कारण आहात. आपणास माझा वारंवार नमस्कार असो .जसे सर्व नद्या, झरे इत्यादींचा अंतिम आधार समुद्र आहे तसेच आपण सर्व वेद आणि शास्त्रांचे मुख्य आधार आहात. आपण मोक्षस्वरूप आहात आणि सर्व भक्तांची परमगती आहात आपल्याला मी नमस्कार करतो .**

गुणारणिच्छन्नचिदूष्मपाय,

तत्क्षोभविस्फूर्जितमानसाय।

नैष्कर्म्यभावेन विवर्जितागम-

स्वयं(म्)प्रकाशाय नमस्करोमि ॥ 16 ॥

**ज्याने त्रिगुण रूप अरणीमध्ये ज्ञानरूप अग्नी गुप्त ठेवला आहे आणि त्या गुणांमध्ये क्षोभ निर्माण करून त्यांच्या द्वारा विविध प्रकारची सृष्टी रचण्याचा ज्याने संकल्प केला जे लोक आत्मचिंतनाने, वेदाने सांगितलेल्या विधी निषेधांच्या पलीकडे जातात त्यांच्या अंतकरणात जे स्वतःच प्रकाशित होतात त्या तुम्हाला मी नमस्कार करतो .**

मादृक्प्रपन्नपशुपाशविमोक्षणाय,

मुक्ताय भूरिकरुणाय नमोऽलयाय।

स्वां(म्)शेन सर्वतनुभृन्मनसि प्रतीत-

प्रत्यग्दृशे भगवते बृहते नमस्ते ॥ 17 ॥

**जाळ्यात अडकलेल्या पशुला सोडवावे त्याप्रमाणे आपण माझ्यासारख्या शरणागताचा संसार पाश तोडून त्याला मुक्त करता याबाबतीत आपल्याला आळस नाही. आपण नित्यमुक्त आहात, परम करुणामय**

आहात. आपण सर्व प्राण्यांच्या हृदयात आपल्या अंशाने अंतरात्म्याच्या रूपामध्ये उपलब्ध होत असता.आपण सर्व ऐश्वर्यांनी पूर्ण तसेच अनंत आहात मी आपणास नमस्कार करीत आहे .

**आत्मात्मजाप्तगृहवित्तजनेषु सक्तैर्-**

**दुष्प्रापणाय गुणसङ्गविवर्जिताय।**

**मुक्तात्मभिः(स्) स्वहृदये परिभाविताय,**

**ज्ञानात्मने भगवते नम ईश्वराय ॥ 18 ॥**

जे लोक शरीर, पुत्र, बांधव,घर, संपत्ती आणि स्वजनांमध्ये आसक्त आहेत त्यांना आपली प्राप्ती होणे कठीण आहे. आपण गुणांच्या पलीकडे आहात. जीवन मुक्त पुरुष आपल्या हृदयात आपले निरंतर चिंतन करीत असतात. त्या सर्व ऐश्वर्य पूर्ण ज्ञान स्वरूप भगवंतांना मी नमस्कार करतो .

**यं(न्) धर्मकामार्थविमुक्तिकामा,**

**भजन्त इष्टां(ङ्) गतिमाप्नुवन्ति।**

**किं(न्) त्वाशिषो रात्यपि देहमव्ययं(ङ्),**

**करोतु मेऽदभ्रदयो विमोक्षणम् ॥ 19 ॥**

धर्म,अर्थ,काम आणि मोक्षाच्या इच्छेने मनुष्य ज्यांचे भजन करून आपले इष्ट ध्येय प्राप्त करून घेतो, इतकेच नव्हे तर जे त्याला सर्व प्रकारचे सुख देऊन अविनाशी पार्षद  शरीर सुद्धा देतात , तेच परमदयाळू प्रभू मला मुक्त करोत.

**एकान्तिनो यस्य न कञ्चनार्थं(वँ),**

**वाञ्छन्ति ये वै भगवत्प्रपन्नाः।**

**अत्यद्भुतं(न्) तच्चरितं(म्) सुमंगलं (ङ्),**

**गायन्त आनन्दसमुद्रमग्नाः ॥ 20 ॥**

ज्यांचे अनन्य भक्त त्यांना शरण जाऊन त्यांच्याकडून कोणत्याही वस्तूची अभिलाषा धरीत नाहीत उलट त्यांच्या परमदिव्य मंगलमय लीलांचे गायन करीत आनंद समुद्रात डुंबत राहतात .

तमक्षरं(म्) ब्रह्म परं(म्) परेश-

मव्यक्तमाध्यात्मिकयोगगम्यम्।

अतीन्द्रियं(म्) सूक्ष्ममिवातिदूर-

मनन्तमाद्यं(म्) परिपूर्णमीडे ॥ 21 ॥

जे अविनाशी ,सर्व शक्तिमान,अव्यक्त,इंद्रियातित आणि अत्यंत सूक्ष्म आहेत ,जे अत्यंत जवळ असून सुद्धा अतिशय लांब आहेत असे वाटते, जे ज्ञान योगाने प्राप्त होतात त्या आधी पुरुष, अनंत तसेच परिपूर्ण परब्रम्ह परमात्म्याची मी स्तुती करीत आहे .

यस्यं ब्रह्मादयो देवा, वेदा लोकाश्चराचराः।

नामरूपविभेदेन, फल्व्या च कलया कृताः ॥ 22 ॥

यथार्चिषोऽग्नेः(स्) सवितुर्गभस्तयो,

निर्यान्ति संयान्त्यसकृत् स्वरोचिषः।

तथा यतोऽयं(ङ्) गुणसंप्रवाहो,

बुद्धिर्मनः(ख्) खानि शरीरसर्गाः ॥ 23 ॥

स वै न देवासुरमर्त्यतिर्यं(ङ्),

न स्त्री न षण्ढो न पुमान् न जन्तुः।

नायं(ङ्) गुणः(ख्) कर्म न सन्न चासन्,

निषेधशेषो जयतादशेषः ॥ 24 ॥

ज्यांच्या अत्यंत लहानशा अंशाने अनेक नामरूप आणि युक्त अशा ब्रह्मदेवादी देव,वेद आणि चराचर लोकांची उत्पत्ती झाली.जसे धगधगणाऱ्या आगीपासून ज्वाला आणि सूर्यापासून त्याचे अनेक किरण वारंवार उत्पन्न होतात आणि त्यातच लय पावतात तसेच ज्या स्वयंप्रकाश परमात्म्यापासून बुद्धी,मन, इंद्रिये ,शरीर,रूप इत्यादी गुणांचा प्रवाह वारंवार प्रगट होतो आणि त्यातच लय पावतो. तो परमात्मा देव नाही,

असुर नाही,मनुष्य किंवा पशुपक्षी नाही,स्त्री नाही ,पुरुष नाही, नपुसंक नाही की कोणी प्राणी नाही, तो गुण नाही, कर्म नाही, कार्य नाही की कारण नाही. सर्वांचा निषेध झाल्यावर जे काही शिल्लक राहते तेच त्याचे स्वरूप आहे .तसेच ते सर्व काही आहेत तेच परमात्मा माझा उद्धार करण्यासाठी प्रगट होवोत .

## जिजीविषे नाहमिहामुया कि-
## मन्तर्बहिश्चावृतयेभयोन्या।
## इच्छामि कालेन न यस्य विप्लवस्-
## तस्यात्मलोकावरणस्य मोक्षम् ॥ 25 ॥

मी जिवंत राहू इच्छित नाही कारण हा हत्तीचा जन्म आतून,बाहेरून, सगळीकडून अज्ञानाने झाकला गेलेला आहे. हा देह जगून काय फायदा? आत्मप्रकाश झाकणाऱ्या त्या अज्ञानरूप आवरणातून मी सुटका करून घेऊ इच्छितो.हे आवरण कालक्रमानुसार आपले आपण नाहीसे होत नाही ते केवळ आपल्या कृपेनेच नाहीसे होणारे आहे .

## सोऽहं(वँ) विश्वसृजं(वँ) विश्व-
## मविश्वं(वँ) विश्ववेदसम्।
## विश्वात्मानमजं(म्) ब्रह्म,
## प्रणतोऽस्मि परं(म्) पदम् ॥ 26 ॥

जे विश्व रहित असूनही विश्वाचे निर्माते आणि विश्वस्वरूप आहेत, त्याचबरोबर जे विश्वाच्या अंतरात्म्याच्या रूपात विश्वरूप सामग्रीने क्रीडा सुद्धा करतात ,त्या परब्रम्ह परमात्म्यांना म्हणूनच मी शरण आलो आहे. त्या अजन्मा परमपदस्वरूप ब्रह्माला मी नमस्कार करीत आहे .

## योगरन्धितकर्माणो, हृदि योगविभाविते।
## योगिनो यं(म्) प्रपश्यन्ति, योगेशं(न्) तं(न्) नतोऽस्म्यहम् ॥ 27 ॥

योगी लोक योगाच्या द्वारे कर्म ,कर्म वासना आणि कर्म फलाला भस्म करून आपल्या योगशुद्ध हृदयामध्ये ज्या योगेश्वर भगवंताचा साक्षात्कार करून घेतात त्या प्रभुंना मी नमस्कार करतो .

नमो नमस्तुभ्यमसह्यवेग-

शक्तित्रयायाखिलधीगुणाय।

प्रपन्नपालाय दुरन्तशक्तये,

कदिन्द्रियाणामनवाप्यवर्त्मने ॥ 28 ॥

प्रभू सत्व ,रज आणि तम या आपल्या तीन शक्तींचे रागादी वेग असह्य आहे. सर्व इंद्रिये आणि मनाच्या विषयांच्या रूपामध्ये सुद्धा आपणच प्रतीत होत असता म्हणून इंद्रिये ज्यांच्या ताब्यात नाहीत त्यांना तर आपल्या प्राप्तीचा मार्ग सुद्धा सापडत नाही. आपली शक्ती अनंत आहे .आपण शरणागत वत्सल आहात. आपल्याला मी वारंवार नमस्कार करतो .

नायं(वँ) वेद स्वमात्मानं(यँ), यच्छक्त्याहं(न्)धिया हतम्।

तं(न्) दुरत्ययमाहात्म्यं(म्), भगवन्तमितोऽस्म्यहम् ॥ 29 ॥

आपल्या मायेच्या अहंबुद्धीने आत्म्याचे स्वरूप झाकले गेले आहे म्हणूनच हा जीव आपले स्वरूप जाणू शकत नाही .आपला महिमा अपरंपार आहे अशा भगवंतांना मी शरण आलो आहे .

श्री शुक उवाच

एवं(ङ्) गजेन्द्रमुपवर्णितनिर्विशेषं(म्),

ब्रह्मादयो विविधलिङ्गभिदाभिमानाः।

नैते यदोपससृपुर्निखिलात्मकत्वात्,

तत्राखिलामरमयो हरिराविरासीत् ॥ 30 ॥

श्री शुक म्हणतात- गजेंद्राने नाम रूप रहित भगवंतांची स्तुति केली होती म्हणून वेगवेगळी नावे आणि रूपे यांचे अभिमानी ब्रह्मदेवादी देव त्याचे रक्षण करण्यासाठी आले नाहीत त्यावेळी सर्वात्मा असल्याकारणाने सर्व देवस्वरूप भगवान श्रीहरी स्वतः प्रकट झाले .

तं(न्) तद्वदार्त्तमुपलभ्य जगन्निवासः(स्) ,

स्तोत्रं(न्) निशम्य दिविजैः (स्) सहसं(म्)स्तुवद्भिः।

छन्दोमयेन गरुडेन समुह्यमानश्-

चक्रायुधोऽभ्यगमदाशु यतो गजेन्द्रः ॥ 31 ॥

विश्वाचा एकमेव आधार असलेल्या भगवंतांनी गजेंद्र संकटात असल्यामुळे स्तुती करीत आहे असे पाहून चक्रधारी भगवान वेदमय गरुडावर आरूढ होऊन अत्यंत वेगाने जेथे गजेंद्र होता तेथे आले तेव्हा त्यांची स्तुती करीत देव सुद्धा त्यांच्याबरोबर तेथे आले .

सोऽन्तः(स्) सरस्युरुबलेन गृहीत आर्तो,

दृष्ट्वा गरुत्मति हरिं(ङ्) ख उपात्तचक्रम्।

उत्क्षिप्य साम्बुजकरं(ङ्) गिरमाह कृच्छ्रान्-

नारायणाखिलगुरो भगवन् नमस्ते ॥ 32 ॥

शक्तिमान मगराने सरोवरात गजेंद्राला पकडून ठेवले होते, त्यामुळे तो कासावीस झाला होता. गरुडावर स्वार होऊन हातात चक्र घेतलेल्या भगवान श्रीहरींना आकाशात पाहून त्याने आपल्या सोंडेने कमळ त्यांना समर्पण करून कसेबसे तो म्हणाला हे नारायणा ,जगद्गुरु भगवन आपणास नमस्कार असो .

तं(वँ) वीक्ष्य पीडितमजः (स्) सहसावतीर्य,

संग्राहमाशु सरसः(ख्) कृपयोज्जहार।

ग्राहाद् विपाटितमुखादरिणा गजेन्द्रं(म्),

सं(म्)पश्यतां(म्) हरिरमूमुचदुस्रियाणाम् ॥ 33 ॥

गजेंद्राला अत्यंत पिडा होत आहे असे जेव्हा भगवंतांनी पाहिले तेव्हा त्यांनी गरुडावरून एकदम खाली उडी घेतली आणि करुणा येऊन गजेंद्राबरोबर मगरालाही अत्यंत वेगाने सरोवराच्या बाहेर काढले नंतर सर्व देवांच्या देखतच भगवान श्रीहरींनी चक्राने मगराचे तोंड फाडले आणि गजेंद्राला सोडविले .

इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहंस्यां(म्)

संहितायामष्टमस्कंधे गजेंद्रमोक्षणे तृतीयोऽध्यायः ॥